महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**क्र. पी.आर-३/जीवन संजीवनी /** No 24190 **दिनांक** 20 JUL 2009

## वाणिज्य परिपत्रक क्र. ९६

**विषय :- ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकित वीज देयकांच्या अदायगीसाठी "जीवन संजीवनी" योजना लागू करण्याबाबत.**

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.०२०/पापू-०७ दि. १५ जून २००९

राज्यात अनेक प्रादेशिक / स्वतंत्र योजना देखभाल दुरुस्ती अभावी तसेच वीज देयके प्रलंबित असल्यामुळे कायमस्वरुपी किंवा अधून मधून बंद राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. याच बरोबर मागील २ वर्षात ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठीच्या वीज दरात झालेल्या वाढीमुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची वीज देयके थकीत राहण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून आल्यामुळे शासनाने वरील संदर्भिय शासननिर्णयाव्दारे ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकित वीज देयकांच्या अदायगीसाठी **"जीवन संजीवनी"** योजना जाहिर केलेली आहे.

जीवन संजीवनी योजनेत ग्रामपंचायत / जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या ग्राहक संस्थांना सहभागी होता येईल.

शासन निर्णया प्रमाणे **"जीवन संजीवनी"** योजनेचे स्वरुप, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) राज्यातील ग्रामीण भागातील प्रादेशिक व स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयके असणा-या ग्राहक संस्थांना (ग्रामपंचायत / जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) जीवन संजीवनी योजनेत सहभागी होता येईल.

२) या योजनेकरिता सप्टेंबर २००९ च्या देयकात समाविष्ट थकबाकी गृहीत धरण्यात येईल.

३) ग्राहक संस्थांनी केलेल्या विनंती अर्जानुसार महावितरण कंपनीने दिलेल्या मागणी पत्राप्रमाणे ग्राहक संस्थेने थकबाकीच्या मुळ रकमेच्या ५० टक्के रक्कम ३१ ऑक्टोबर २००९ पर्यंत भरल्यास संबंधित ग्राहक संस्था या योजनेत सहभागी झाल्याचे मानण्यात येईल.

४) उर्वरित थकीत ५० टक्के रक्कम येणा-या पुढील विद्युत देयकांसोबत ६ समान हप्त्यात १ वर्षात भरावी. (म्हणजेच ५०टक्के रक्कम ३१ ऑक्टोंबर पर्यंत भरल्यास उर्वरित रकमेचा पहिला हप्ता २ महिन्यानंतरच्या कालावधीत म्हणजेच ३१ डिसेंबर पर्यंत त्यानंतर २-२ महिन्याच्या कालावधीत हप्त्यांचा भरणा करावा.)

५) या योजनेत सहभागी होणा-या ग्राहक संस्थांना पुढील सर्व चालू वीज देयके वेळेवर भरणे बंधन कारक राहील.

६) ज्या ग्राहक संस्था सुरुवातीला मुळ रकमेच्या ५० टक्के रक्कम भरल्यानंतर उर्वरित मुळ रक्कमेचे हप्ते व चालू वीज देयके विहित कालावधीत न भरल्यास अशा ग्राहकसंस्था या योजनेच्या सवलतींचा लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

७) थकबाकीच्या मुळ रकमेवरील व्याजाच्या रकमे पैकी २५ टक्के रक्कम पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग अनुदानातून महावितरण कंपनीस परस्पर अदा करेल.

८) उर्वरित ७५ टक्के व्याजाची रक्कम व विलंब आकारणी महावितरण कंपनीकडून माफ करण्यात येईल.

९) वरीलप्रमाणे मुळ थकबाकीच्या ५० टक्के एक रकमी रक्कम व उर्वरित ५० टक्के रक्कमेचे हप्ते व चालू देयके विहित कालावधीत न भरल्यास माफ केलेली व्याजाची व विलंब आकाराची रक्कम व संपूर्ण थकबाकी ऑक्टोबर २००९ च्या स्थितीतील पुर्व पदावर येईल.

१०)या योजनेत सहभागी होणा-या ग्राहक संस्थांनी सहभागी होत असल्याचा आशयाचा ठराव करुन महावितरण कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे योजनेत सहभागी होत असल्याचा प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करावा.

११)ज्या ग्राहक संस्था ३१ ऑक्टोबर २००९ पर्यंत ठराव करुन ५० टक्के रक्कम महावितरण कंपनीकडे भरतील त्यांनाच या सवलतीचा लाभ मिळेल. तसेच या सहभागी ग्राहक संस्थांना पुढील सर्व चालू वीज देयके वेळेवर भरणे बंधनकारक राहील.

सोबत जीवन संजीवनी योजनेत सहभागी होत असल्याबाबत ग्रामपंचायतीने करावयाचा ठरावाचा नमुना (परिशिष्ट-अ), हमीपत्र (परिशिष्ट-ब), ग्रामपंचायतीने महावितरण कंपनीकडे करावयाचा अर्जाचा नमुना (परिशिष्ट-क) आणि जीवन संजीवनी योजनेमध्ये सहभागी झाल्यानंतर महावितरण कंपनीने ग्रामपंचायतीस कळविण्याचे प्रपत्र (परिशिष्ट-ड) सोबत संलग्न आहेत.

तरी सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सुचित करण्यात येते की, ग्राहक संस्थेने संजीवनी योजनेत सहभागी होत असल्याचा प्रस्ताव विहित नमुन्यात सादर केल्यानंतर ग्राहकाला सप्टेंबर २००९ च्या बिलामध्ये दर्शविलेली मुळ थकबाकी, विलंब आकार व व्याजाची रक्कम हयाची माहिती दयावी. ग्राहकाने योजनेला अनुसरुन ५० टक्के मुळ रकमेचा भरणा ३१ ऑक्टोंबर २००९ पर्यंत केल्यानंतर ग्राहकाला उर्वरित ५० टक्के मुळ थकबाकीची २-२ महिन्याच्या अंतराची सहा देयके आगाऊ देण्यात यावीत.

सदर योजनेच्या अंमलबजावणीचा विभाग निहाय अहवाल संबंधित परिमंडळाचे मुख्य अभियंता यांनी मुख्य कार्यालयात मुख्य अभियंता वाणिज्य यांच्याकडे पाठवावा आणि या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होईल याबाबत क्षेत्रिय अधिका-यानी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. याबाबत काही शंका उदभवल्यास मुळ सरकारी आदेशाचा (शासन निर्णय क्र.ग्रापाधो-११०९/ प्र.क्र.-०२०/ पापु-०७ दि.१५.०६.०९) संदर्भ घ्यावा. शासन निर्णयाबाबतचा आदेश परिशिष्ठ अ,ब,क व ड सह सोबत जोडलेला आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

**संचालक (संचलन)**

**प्रती :-**

मुख्य महाव्यवस्थापक, (माहिती व तंत्रज्ञान).

**प्रती :-**

सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ, (महावितरण)

सर्व अधिक्षक अभियंता, सं व सु मंडळ, महावितरण,

सर्व कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग, महावितरण,

सर्व उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता, सं व सु उपविभाग, महावितरण,

ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकित वीज देयकांच्या अदायगीसाठी "जीवन संजीवनी" योजना लागू करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.०२०/पापु-०७**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- १५ जून, २००९**

**प्रस्तावना:**

भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्य घटनेच्या ११ व्या अनुसूचिनुसार ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा विषय हा संपूर्णपणे पंचायत राज संस्थांच्या अधिकार क्षेत्रात आल्यानंतर राज्य शासनाने अधिकाधिक अधिकार व जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे देण्याच्या पुरोगामी धोरणाचा अवलंब केला आहे. जुलै २००० पासून राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम मागणी आधारित जनतेच्या सहभागाच्या लोकाभिमुख धोरणानुसार राबविण्यात येत आहे. त्यानुसार पिण्याच्या पाणी पुरवठा उपाययोजनेची मागणी, आखणी, अंमलबजावणी, कार्यान्वयन व देखभाल दुरुस्ती ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनीच पूर्णपणे करावयाची आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यावर ती योजना एका गावाची (स्वतंत्र) असल्यास संबंधित ग्राम पंचायतीमार्फत तर, एकापेक्षा अनेक गावांची (प्रादेशिक) योजना असल्यास जिल्हा परिषदेमार्फत किंवा संयुक्त समितीमार्फत तिचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. शिवाय काही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फतही चालविल्या जातात.

शासनाने वारंवार सूचना दिलेल्या असल्या तरीही, अनेक ग्रामपंचायती, त्यांच्या पाणी पुरवठा योजनांच्या वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चाचा अंदाज घेऊन त्यानुसार, पाणी पट्टी आकारीत नाहीत व त्यानुसार पाणी पट्टीची परिणामकारक वसूली केली जात नाही. परिणामी योजनांची योग्य रितीने देखभाल दुरुस्ती न झाल्याने, योजना नादुरुस्त होणे, वीज देयकांची थकबाकी राहणे इ. प्रश्न निर्माण होतात. अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांची मर्यादित आर्थिक कुवत व लाभार्थ्यांकडून होऊ शकणा-या पाणीपट्टी वसूलीचे प्रमाण अत्याल्प असल्याने राज्याच्या ग्रामीण भागातील अनेक योजनांचे कार्यान्वयन, योग्य रित्या होत नसल्याचे दिसून

आले आहे. परिणामी, अनेक प्रादेशिक / स्वतंत्र योजना देखभाल दुरुस्ती अभावी तसेच वीज देयके प्रलंबीत असल्यामुळे कायमस्वरुपी किंवा अधूनमधून बंद राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. याच बरोबर मागील २ वर्षात ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठीच्या वीज दरात झालेल्या वाढीमुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची वीज देयके थकीत राहण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे. यामुळे संबंधित गावातील पिण्याच्या पाणी पुरवठयावर परिणाम झाल्याने, ग्रामीण जनतेस शुध्द व स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे शासनाचे उद्दिष्ट बाधित होत आहे. ही बाब विचारात घेऊन ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकित वीज देयकांच्या अदायगीकरिता सवलतीवर आधारित योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत असलेल्या वीज देयकांच्या अदायगीसाठी **"जीवन संजीवनी"** योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पिण्याच्या नळपाणी पुरवठा चालविणाऱ्या ज्या **ग्राहकसंस्था म्हणजे ग्रामपंचायत/जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** वीज देयकाच्या थकबाकीची मूळ रक्कम या शासन निर्णयात पुढे नमूद केल्याप्रमाणे भरतील, त्यांच्या मुळ रकमेवरील व्याजाची २५% रक्कम शासनामार्फत (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) भरण्यात येईल व उर्वरित ७५% व्याजाची रक्कम महावितरण कंपनीकडून माफ करण्यात येईल.

२. ग्राहक संस्थांनी केलेल्या विनंती अर्जानुसार महावितरण कंपनीने दिलेल्या मागणीपत्राप्रमाणे ग्राहकसंस्थेने थकबाकीच्या मूळ रकमेच्या ५०% रक्कम ३१ ऑक्टोबर, २००९ पर्यंत भरल्यास, संबंधित ग्राहकसंस्था योजनेत सहभागी झाल्याचे मानण्यात येईल.

३. या योजनेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

३.१ राज्यातील ग्रामीण भागातील प्रादेशिक व स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयके असणाऱ्या ग्राहकसंस्थांना (ग्रामपंचायत / जिल्हा परिषद/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) जीवन संजीवनी योजनेत सहभागी होता येईल.

३.२ जीवन संजीवनी योजनेअंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या वीज ग्राहकसंस्थांनी थकित वीज बिलांच्या मूळ रकमेपैकी ५० टक्के रक्कम एकरकमी भरावी, संबंधित ग्राहकसंस्था ही रक्कम स्वतःचे उत्पन्न व बाराव्या वित्त आयोगाचा उपलब्ध होणारा निधी यातून ३१ ऑक्टोबर पर्यंत भरतील.

३.३ उर्वरित थकित ५० टक्के रक्कम येणा-या पुढील विद्युत देयकांसोबत सहा समान हप्त्यात एक वर्षात भरावी. तसेच चालू वीज देयके वेळेवर भरावीत. ज्या ग्राहकसंस्था सुरूवातीला मूळ रक्कमेची ५०% रक्कम भरल्यानंतर उर्वरित मूळ रकमा व चालू वीज देयके विहित कालावधीत भरणार नाहीत, अशा ग्राहकसंस्था या योजनेच्या सवलतींचा लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

३.४ ज्या ग्राहकसंस्था वरीलप्रमाणे मूळ रकमेच्या ५० टक्के रक्कम एकरकमी भरतील अशा ग्राहकसंस्थांच्या वीज बिलांच्या थकबाकीच्या मूळ रकमेवरील व्याजाच्या रकमेपैकी २५ टक्के व्याजाची रक्कम पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये उपलब्ध होणाऱ्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानातून महावितरण कंपनीस अदा करणेत येईल. उर्वरित ७५ टक्के व्याजाची रक्कम व विलंब आकारणी महावितरण कंपनीकडून माफ करण्यात येईल. मूळ रकमेच्या उर्वरित ५०% रकमेच्या **सर्व ६ समान हप्त्यांचा भरणा केल्यानंतरच ७५% व्याजाच्या रकमेच्या माफीचे अंतिम आदेश महावितरण कंपनीकडून काढण्यात येईल**

३.५ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या वीज ग्राहकसंस्थांना दिनांक ३१ ऑक्टोबर, २००९ पर्यंत जीवन संजीवनी योजनेत सहभागी होता येईल. या कालावधीत सहभागी होणाऱ्या ग्राहकसंस्थांनाच वरील सवलतींचा लाभ होईल. योजनेत सहभागी होणाऱ्या ग्राहकसंस्थांनी तशा आशयाचा ठराव करून महावितरण कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे संपर्क साधावा.

३.६ ज्या ग्राहकसंस्था **३१ ऑक्टोबर, २००९ पर्यंत ठराव करून ५० टक्के रक्कम महावितरण कंपनीकडे भरतील त्यांनाच या सवलतीचा लाभ मिळेल.** या सहभागी ग्राहकसंस्थांना **पुढील सर्व चालू वीज देयके वेळेवर भरणे बंधनकारक राहील..**

३.७ महावितरण कंपनीने या योजनेत सहभागी झालेल्या ग्राहकसंस्थांची माहिती व संबंधित योजनांची २५ टक्केप्रमाणे येणारी व्याजाची रक्कम पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास कळविल्यानंतर दोन समान हप्त्यांत डिसेंबर, २००९ पर्यंत महावितरण कंपनीस ही रक्कम अदा करण्यात येईल.

४. सहभागी होऊ इच्छिणा-या ग्राहकसंस्थांनी योजनेमध्ये सहभागी होत असल्याबाबत **परिशिष्ट-अ** प्रमाणे ठराव पारित करावा. या ठरावासह ग्राहकसंस्थांनी परिशिष्ट-ब प्रमाणे महावितरण कंपनीला हमी पत्रे सादर करावीत. पारित केलेल्या ठरावासह ग्राहकसंस्थांने

योजनेत सहभागी होण्याकरिता **परिशिष्ट-क** प्रमाणे अर्ज महावितरण कंपनीकडे सादर करावा. आलेल्या अर्जाची आवश्यक ती छाननी करून महावितरणने **परिशिष्ट-ड** प्रमाणे थकबाकीबाबत संबंधित ग्राहकसंस्थेंस कळवावे.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या योजनेची माहिती जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना करून द्यावी व योजनेत सहभागी होण्याचे आवाहन करावे. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध प्रकारे प्रचार व प्रसिद्धी करावी.

६. या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यासाठीचे आदेश ग्राम विकास विभाग आणि उर्जा विभागाकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०६१५१४१३४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अजितकुमार जैन)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व तहसीलदार
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

# परिशिष्ट -अ

## जीवन संजीवनी योजनेत सहभागी होत असल्याबाबत ग्रामपंचायतीने* करावयाचा ठरावाचा नमुना

----------- ग्रामपंचायतीची सर्वसाधारण मासिक सभा, मा. सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात दि. ------------ रोजी ---------- वाजता पुढील विषयावर विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली, या सभेला खालील सभासद उपस्थित होते.

१)
२)
३)
४)
५)

**विषय क्रमांक** -------- :- शासनाने जाहिर केलेल्या जीवन संजीवनी योजनेत सहभागी होणेबाबत.

**ठराव क्रमांक ---------**

शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने त्यांच्या शासन निर्णय क्रमांक :- ग्रापाधो - ११०९ / प्र.क्र २०/पापु - ०७ दि. १५ जून २००९ अन्वये वीज बिल थकबाकी असलेल्या ग्रामिण स्वतंत्र व प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनांसाठी जीवन संजीवनी योजना लागू करण्याचा निर्णय घेताला आहे.

या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती उपस्थित सदस्यांना वाचून दाखविण्यात आलेल्या आहेत व त्या या ग्रामपंचायतीस मान्य आहेत. गावांतील नळपाणी पुरवठा योजनेवर वीज बिलाची असलेली थकबाकी दुर करण्यासाठी या योजनेमध्ये सहभागी होण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे.

योजनेत सहभागी झाल्यानंतर महावितरण कंपनीने निर्धारित केल्यानुसार मुळ थकबाकीपैकी ५० टक्के रक्कम एक रकमी या ग्रामपंचायीकडून महावितरणकडे जमा करण्यात येईल. उर्वरित ५० टक्के रक्कम ६ समान हप्त्यात नियमित वीज देयकासोबत ही ग्रामपंचायत जमा करेल. जर ऊर्वरित ६ समान हप्त्यापैकीचे हप्ते ग्रामपंचायतीकडून नियमितपणे भरले गेले नाहीत तर ही ग्रामपंचायत जीवन संजीवनी योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरणार नाही, याची या ग्रामपंचायतीस जाणीव आहे.

यापुढे ग्रामपंचायतीकडून नळपाणी पुरवठा योजना नियमित व सातत्याने चालू राहावी यासाठी नळपाणी पुरवठा योजनेच्या एकूण वार्षिक खर्चाचा आढावा घेऊन (यामध्ये वीज देयकांवरील खर्च, वेतन, प्रत्यक्ष देखभाल दुरुस्ती, पाणी शुध्दी करणासाठी येणारा खर्च, अन्यकाही विशिष्ठ खर्च असल्यास तो धरुन) पुढील आर्थिक वर्षासाठीचे पाणीपट्टीचे दर या ग्रामपंचातीकडून निश्चित केले जातील याची ही ग्रामपंचायत हमी घेते.

ग्रामपंचातीने उपरोक्त अटींची पुर्तता न केल्यास अथवा टाळाटाळ केल्यास ग्रामपंचायतीला शासनाकडून १२ वा वित्त आयोगाच्या वा देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानातून शासनाने परस्पर वीज देयकांच्या रकमा वळती केल्यास या ग्रामपंचायतीची हरकत राहणार नाही.

सुचक श्री.
अनुमोदक श्री.

**ठराव क्रमांक** ----------- सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक** **सरपंच, ग्रामपंचायत -----------**

***जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकारण यांची योजना असल्यास त्याप्रमाणे नमुद करावे.**

## *परिशिष्ट - ब*

## हमीपत्र

**मी श्री./श्रीमती**.........................................ग्रामपंचायत*............................ तालुका............................जिल्हा..........................चा/ची सरपंच असून ग्रामपंचायत/ग्रामसभेमध्ये जीवन संजीवनी योजनेत सहभागी होत असल्याबाबतचा ठराव पारीत केलेला आहे. सार्वजनिक नळपाणी पुरवठाच्या जीवन संजीवनी योजनेमध्ये सहभागी होऊ इच्छितो. आज तारखे पर्यंत सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजनेच्या वीज बिलापोटी ग्रामपंचायतीवर रु...................ची थकबाकी आहे. त्यापैकी मुळ थकबाकीच्या ५० टक्के रक्कम नगदी / धनादेशाद्वारे भरण्यास तयार आहे. उरलेली ५० टक्के रक्कम आज तारखेपासून १२ महिन्यात सहा हप्त्यामध्ये भरण्याची हमी देत आहोत. सदर हप्त्याची रक्कम भरण्यास ग्रामपंचायत असमर्थ ठरल्यास महावितरण कंपनीला सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडीत करण्याचे अधिकार रहातील.

**दिनांक.............** **सही**

**सरपंच**

**.................ग्रामपंचायत**

***जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकारण यांची योजना असल्यास त्याप्रमाणे नमुद करावे.**

# परिशिष्ट - क

## ग्रामपंचायतीने* महावितरण कंपनीकडे करावयाचा अर्जाचा नमुना

१) ग्रामपंचायतीचे नाव :- ...................तालुका :-............जिल्हा:-............
२) पाणी पुरवठा योजनेची संख्या :-
३) पाणी पुरवठा योजनेच्या वीज पुरवठयाचा ग्राहक क्र. :-
४) जोडणी भार :- .............अश्वशक्ती
५) वीज पुरवठयाची सध्यस्थिती :- चालू / तात्पुरता खंडीत / कायमचा खंडीत
६) थकबाकीच्या रकमेचा भरणा :- रु............(नगदी /धनादेश )
७) निधी भरण्याच्या क्षमतेचे पंचायत समितीकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय :- होय / नाही.
८) ग्रामपंचायत/ग्रामसभेचे पारित केलेले ठराव सोबत जोडले आहे काय :- होय / नाही.

महावितरण कंपनीकडून प्राप्त झालेली थकबाकीची माहिती :-

| | | |
|---|---|---|
| अ. | मुळ थकबाकी :- | रु. ............... |
| ब. | विलंब आकार:- | रु. ............... |
| क. | व्याज :- | रु. ............... |
| ड. | एकूण | रु. ............... |

शासनाने जाहीर केलेले पाणी पुरवठा योजनेच्या वीज देयकाच्या थकबाकीत सवलत देणेविषयीच्या जीवन संजीवनी योजनेत ग्रामपंचायात सहभागी होऊ इच्छिते. या योजनेच्या अटी मान्य असल्याचे हमीपत्र सोबत जोडलेले आहे. तरी कृपया या योजनेत ग्रामपंचायतीला समाविष्ट करावे.

**स्वाक्षरी**

**सरपंच**

**...............ग्रामपंचायत**

*** जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकारण यांची योजना असल्यास त्याप्रमाणे नमुद करावे.**

## परिशिष्ट- ड

### *जीवन संजीवनी योजनेमध्ये सहभागी झाल्यांनतर महावितरण कंपनीने ग्रामपंचायतीस* कळविण्याचे प्रपत्र*

प्रति,

**सरपंच,**

........................... **ग्रामपंचायत,**

**तालुका** .........................

**जिल्हा** ..............................

**विषय :- जीवन संजीवनी योजनेअंतर्गत वीज बिलापोटीच्या थकबाकीची रक्कम भरण्याबाबत.**

**महोदय,**

शासन आदेशानुसार सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजनेच्या वीज बिलाच्या थकबाकीमध्ये सवलत देण्याच्या जीवन संजीवनी योजनेमध्ये भाग घेण्याबद्दलचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला.

सदर बाबतीत आपणास कळविण्यात येते की, आज दिनांक................पर्यंत आपल्या ग्रामपंचायतीवर वीज बिलापोटी खालीलप्रमाणे थकबाकी आहे.

अ) मुळ थकबाकी :- रु..................

ब) विलंब आकार :- रु..................

क) व्याज :- रु..................

ड) एकूण :- रु..................

वरील थकबाकी विचारात घेता जीवन संजीवनी येजनेच्या अटीनुसार आपणास सदर थकबाकीचा खालीलप्रमाणे भरणा करावयाचा आहे.

अ. ५० टक्के मुळ थकबाकी रु............... चा भरणा तात्काळ करावा.

ब. उरलेले ५० टक्के मुळ थकबाकीचा भरणा खालीलप्रमाणे १२ महिन्यात सहा हप्त्यात करावा.

१) पहिला हप्ता रु............. चा भरणा ५० टक्के रक्कम भरल्यानंतर पुढील बिलात

२) दुसरा हप्ता रु. ............. चा भरणा दि. (वरील हप्त्याचा दोन महिन्यानंतर)

३) तिसरा हप्ता रु. .............चा भरणा दि.(वरील हप्त्याचा दोन महिन्यानंतर)

४) चौथा हप्ता रु. ............. चा भरणा दि.(वरील हप्त्याचा दोन महिन्यानंतर )

५) पाचवा हप्ता रु. .............चा भरणा दि.(वरील हप्त्याचा दोन महिन्यानंतर)

६) सहावा हप्ता रु. .............चा भरणा दि.(वरील हप्त्याचा दोन महिन्यानंतर)

वरील प्रमाणे हप्त्याचा भरणा करण्यास ग्रामपंचायत असमर्थ ठरल्यास सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. तरी कृपया या सुर्वण संधिचा लाभ घेऊन थकबाकीची पुर्ण रक्कम भरावी ही विनंती.

**आपला**

**कनिष्ठ अभियंता / सहा.अभियंता / उप.कार्य. अभियंता**

**महावितरण.**